# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:29.06.2024** **वार:शनिवार**

---

1. महिला, युवा, आणि शेतकऱ्यांसाठी विविध योजनांची तरतूद असलेला राज्याचा अतिरीक्त अर्थसंकल्प विधिमंडळात सादर
2. आषाढी वारीसाठी संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याचं पंढरीकडे प्रस्थान
3. महिला कसोटी क्रिकेटमध्ये भारताची विक्रमी कामगिरी; दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पहिल्याच दिवशी केल्या 525 धावा आणि
4. टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारत आणि दक्षिण आफ्रिकेदरम्यान आज होणाऱ्या अंतिम सामन्याची उत्कंठा

**<u>अर्थसंकल्प</u>**

राज्याचा 2024-25 या आर्थिक वर्षासाठीचा अतिरिक्त अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी काल विधानसभेत सादर केला. महिला, शेतकरी, दुर्बल घटक आणि युवकांच्या हिताला प्राधान्य देणाऱ्या या अर्थसंकल्पात एकूण खर्चासाठी 6 लाख 12 हजार 293 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यात महसुली जमा 4 लाख 99 हजार 463 कोटी रुपये; तर महसुली खर्च 5 लाख 19 हजार 514 कोटी रुपये अपेक्षित आहे. महसुली तूट 20 हजार 51 कोटी रुपये, राजकोषीय तूट 1 लाख 10 हजार 355 कोटी रुपये आहे. विधानपरिषदेत अर्थराज्यमंत्री दीपक केसरकर यांनी अर्थसंकल्प सादर केला.

पेट्रोल आणि डिझेलवरचा मूल्यवर्धित कर राज्यभरात एकसमान करण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी काल केली. त्यानुसार मुंबई, ठाणे आणि नवी मुंबई महापालिका क्षेत्रात डिझेलवरचा व्हॅट सध्याच्या 24 टक्क्यांवरुन 21 टक्के प्रस्तावित केला आहे. यामुळं डिझेल आणि पेट्रोल स्वस्त होईल.

**<u>वारकरी</u>**

वारकरी बांधवांसाठी 'मुख्यमंत्री वारकरी संप्रदाय महामंडळ' स्थापन करण्यात येणार असून पंढरपूर वारीच्या जागतिक नामांकनासाठी युनेस्कोकडे प्रस्ताव पाठवण्यात येणार आहे. वारीतल्या मुख्य दिंड्यांना प्रत्येकी 20 हजार रुपये, तर 'निर्मल वारी'साठी 36 कोटींचा निधी देण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली.

**<u>महिला</u>**

महिलांसाठी या अर्थसंकल्पात विशेष योजना प्रस्तावित असून 21 ते 60 वयोगटातल्या महिलांसाठी 'मुख्यमंत्री-लाडकी बहीण' योजना यावर्षीच्या जुलैपासून लागू होणार आहे. त्याकरता दरवर्षी 46 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. अडीच कोटी महिलांना त्याचा लाभ मिळणार आहे. पात्र कुटुंबांना दरवर्षी तीन गॅस सिलिंडर्स मोफत देणारी मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनाही जाहीर करण्यात आली आहे. ओबीसी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना चालू शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी, स्थापत्यशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, वैद्यकीय, शेतीविषयक सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक आणि परीक्षा शुल्काची संपूर्ण प्रतिपूर्ती देण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. यावर्षी 25 लाख महिलांना लखपती दीदी करण्याचं उद्दिष्ट राज्य सरकारनं ठेवलं आहे.

**<u>युवक</u>**

राज्यातील दहा लाख युवकांना प्रत्यक्ष कामावर प्रशिक्षण आणि दरमहा दहा हजार रुपयांपर्यंत विद्यावेतन देणाऱ्या मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेची घोषणाही करण्यात आली असून अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्था, आय.टी.आय, जागतिक कौशल्य केंद्र, कौशल्य विद्यापीठ अशा विविध संस्थांचं बळकटीकरण करण्याचा निर्णयही राज्य सरकारनं घेतला आहे.

**<u>दुर्बल</u>**

संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतून आता दरमहा एक हजार ऐवजी दीड हजार रुपये अर्थसहाय्य दिलं जाईल. दिव्यांग व्यक्तींसाठी 'धर्मवीर आनंद दिघे घरकुल योजना' जाहीर केली आहे. बारी समाजाच्या विकासासाठी संत श्री रुपलाल महाराज आर्थिक विकास महामंडळाची स्थापना निर्णय सरकारनं जाहीर केला.

**<u>शेतकरी</u>**

मुख्यमंत्री बळीराजा सवलत योजनेंतर्गत राज्यातील 44 लाख शेतकऱ्यांना मोफत वीजपुरवठा करण्यात येणार असून दूध उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिलिटर पाच रुपये अनुदान देण्यात येणार आहे. गाव तिथं गोदाम, बांबूशेतीसाठी अनुदान, सौर कृषीपंप अशा योजनाही अर्थसंकल्पात जाहीर केल्या आहेत.

**<u>प्रतिक्रिया</u>**

राज्याचा अर्थसंकल्प खऱ्या अर्थाने महिला, युवक, शेतकरी यांचा सन्मान करून त्यांना बळ देणारा आहे; महाराष्ट्राला नवी दिशा देणाऱ्या निर्धाराचा हा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली आहे. तर अतिशय प्रगतीशील, समाजातल्या सर्व महत्त्वाच्या घटकांचा विचार करणारा, त्यांना दिलासा देणारा हा अर्थसंकल्प असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. विरोधकांनी या अर्थसंकल्पावर टीका केली आहे. राज्यातील जनतेची दिशाभूल करणारा पोकळ घोषणांचा हा अर्थसंकल्प आहे, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. तर आगामी विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून केलेला पोकळ घोषणांचा हा अर्थसंकल्प असल्याचं माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

**<u>विधिमंडळ कामकाज</u>**

अवकाळी पावसामुळे शेतीचं नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना 15 जुलैपर्यंत मदत देऊ, असं आश्वासन सरकारने काल विधानसभेत दिलं. कोणत्याही पबमध्ये वय न तपासता प्रवेश दिला तर पबचा परवाना रद्द केला जाईल, तसंच गुन्हा दाखल केला जाईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्षवेधी सूचनेवर चर्चा करताना दिली.

**<u>संसद कामकाज</u>**

नीट गैरव्यवहाराच्या मुद्यावरुन विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या कामात काल वारंवार व्यत्यय आला. राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरच्या धन्यवाद प्रस्तावावर चर्चा सुरु झाली. मात्र त्यामध्येही अनेकदा विरोधकांकडून अडथळे येत गेले.

**<u>तुकोबा पालखी</u>**

आषाढी वारीसाठी संत श्री तुकाराम महाराजांच्या पालखीनं काल देहू इथून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवलं. ऐकूया याविषयीची अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**पावसाच्या हलक्या सरी झेलत टाळ मृदंगाच्या गजरात आणि हरिनामाच्या जयघोषात तुकोबांच्या पालखीने काल पंढरीकडे प्रस्थान ठेवलं. तत्पूर्वी मंदिर समितीकडून सोहळ्याच्या कार्यक्रमांना काल पहाटेपासून सुरुवात झाली होती. देहुतील सर्व प्रमुख मंदिरांत पहाटेच्या पारंपरिक महापूजा आणि काकड आरती झाल्यानंतर सकाळी गाथा भजन झालं, प्रथेप्रमाणे देहुकरांच काल्याच कीर्तन झालं. जुन्या परंपरेनुसार कोल्हापूर संस्थानच्या छत्रपती घराण्याकडून आणलेल्या राजाश्रयाच्या जरी पताका देहुकराना प्रदान करण्यात आल्या. त्यांनतर दुपारी घोडेकर सराफ यांच्याकडून मुख्य भजनीमंडपात तुकोबांच्या पादुका आणण्यात आल्या. दुपारी मान्यवरांच्या उपस्थितीत पादुकांची महापूजा झाल्यानंतर देऊळवाड्यातून पालखीने पंढरीकडे प्रस्थान ठेवले. मंदिर प्रदक्षिणा करून पालखीचा काल देहूत इनामदार वाड्यात मुक्काम होता. आज सकाळी हा पालखी सोहळा आकुर्डीच्या दिशेनं मार्गस्थ होत आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी संतोष गोगले, देहू**

**माऊली प्रस्थान**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींचा पालखी सोहळा आज अलंकापुरीतून पंढरीच्या दिशेनं प्रस्थान ठेवणार आहे. आज पालखी सोहळ्याचा मुक्काम आजोळघरी म्हणजे जुन्या गांधी वाड्यातच असेल. उद्या ज्ञानेश्वर माऊली आणि तुकोबारायांची पालखी पुण्यात दाखल होत आहे.

**अपघात**

समृद्धी महामार्गावर जालना हद्दीत झालेल्या अपघातात सात जणांचा जागीच मृत्यू झाला. कडवंची गावाजवळ दोन मोटारींची समोरासमोर धडक होऊन झालेल्या या अपघातात चार जण जखमी झाले आहेत. जखमींवर जालना जिल्हा रुग्णालयात उपचार करण्यात येत आहे.

**महिला क्रिकेट**

महिला क्रिकेटमध्ये, भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात कालपासून चेन्नईत सुरु झालेल्या कसोटी सामन्यात भारतानं, एका दिवसात 525 धावांचा डोंगर रचत विक्रम नोंदवला. स्मृती मंधानानं शतक, तर शेफाली वर्मानं द्विशतक झळकावलं. या दोघींनी केलेली 292 धावांची भागिदारी हाही एक विक्रम आहे. स्मृतीनं 149, तर शेफालीनं 205 धावा केल्या. शेफाली सर्वात जलद शतक करणारी महिला फलंदाज ठरली. तिनं 113 चेंडूत शतक साकारलं.

**पुरुष क्रिकेट**

टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेची अंतिम लढत आज भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात बार्बाडोस इथं रंगणार आहे. दोन्ही संघांनी या स्पर्धेत एकही सामना गमावलेला नाही. त्यामुळे आजचा सामना जिंकून विजेतेपदाचा चषक उंचावण्याच्या इराद्यानं दोन्ही संघ मैदानात उतरतील. भारतीय प्रमाण वेळेनुसार रात्री 8 वाजता सामना सुरू होईल.

**हवामान**

येत्या 24 तासात राज्याच्या बहुतांश भागात पावसाची शक्यता असून कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.